सं. ठाणें.
क्राव्य
११२

# आवडती बायको.

हें लहानसें पुस्तक,

बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर

करितां तयार केलें.

येथें

दादाजी यांच्या

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम

जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
लेखक बा. दि. वैद्य
सन १८९९
ालय क्रमांक ११२
पुस्तकाचें नांव आवडती बायको.

काम ९ २
६२

# आवडती बायको.

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

होता एक गृहस्थ सभ्य अवघे साधूच त्या मानिती ॥
न्यायें वागतसे सदैव ह्मणुनी त्या लोक हे वानिती ॥
संसारांत सदा निमग्न असुनी देवास चिंतीतसे ॥
सोपा हो परमार्थ आणिक तया हा स्वार्थ दोन्ही तसे १
ज्ञानी फार ह्मणून त्यास पुसती वेदांत कोणी तसे ॥
स्वार्थीही पुसती तया भवनिधींमध्येंच वागूं कसे ॥
दोघांना बरवा सुमार्ग कथुनी कल्याण त्यांचें करी ॥
ऐसा थोर गृहस्थ नांदत असे सद्भक्त भीमातिरीं ॥२॥

श्लोक. (भुजंगप्रयात.)

तयाच्या घरीं पूर्ण आनंद होता ॥
पहातांच वाटे समाधान चित्ता ॥
मुलें माणसें एक धंदा करीती ॥
सुखें सर्वही जाणुनी लोकरीती ॥ ३ ॥
मुलें काढिती सूत हो कापसाचें ॥
रहाटास गुंडाळणें काम त्यांचें ॥
अशा त्या सुताला स्त्रिया रंग देती ॥
पतीच्यासवें मागहा चालवीती ॥ ४ ॥

---

१ संसारसमुद्रांत.

श्लोक. ( इंद्रवज्रा. )

घेऊनियां माग विणीत आहे ॥
भार्येसवें[1] एक सुवस्त्र पाहे ॥
संधीस त्या विप्र गरीब आला ॥
साधूस त्या प्रश्न हळूच केला ॥ ५ ॥

श्लोक. ( भुजंगप्रयात. )

अति त्रासलेला असे तो सुविप्र ॥
बहू दुःखदायी तयाचें कलत्रें[2] ॥
पुसे साधुला लोक कैसें करीती ॥
कशी वागवूं स्त्री कशी लोकरीती ॥ ६ ॥

स्त्रियेपासुनी दुःख होतें मला हो ॥
परी बायकोला नसे खेद कां हो ॥
कशा युक्तिनें सौख्यदा[3] ती घडेल ॥
तिची आमुची प्रीति पूर्णा जडेल ॥ ७ ॥

तिच्या संगतीं सौख्य व्हावें भवांत ॥
असावी तिची सर्वदां वृत्ति शांत ॥
नसावा तिच्या राग माझ्या मनांत ॥
अशा सद्गुणें कीर्ति व्हावी जगांत ॥ ८ ॥

असे बुद्धि तीतें असे ती गुणीही ॥
परी क्रूरदृष्टी सदा[illegible] देहीं ॥

---

१ आपल्या बायकोबरोबर. २ कुटुंब ( स्त्री ). ३ सुख देणारी.

कपाळास आंठ्या सदा तप्त अंगीं ॥
नये यामुळें झोंप ती नित्य जागी ॥ ९ ॥
तिला बोललों दाविला धाक तीतें ॥
परी फेर नाहीं तिच्या त्या मतीतें ॥
तिला मारणें हें मला योग्य नाहीं ॥
गमे व्यर्थ जातेच कीं अंगना ही ॥ १० ॥
सुचेना तिला जेवणें खेळणेंही ॥
सुचेना तिला बोलणें चालणेंही ॥
भ्रमिष्टापरी जाहली वृत्ति तीची ॥
सुचावी कशी योग्य सेवा पतीची ॥ ११ ॥
असें ऐकुनी प्रश्न तो साधु बोले ॥
तिचें प्रेम अन्यावरी काय गेलें ॥
जरी यापरी दुर्गुणी ती असेल ॥
कसेंही करा सर्वदां ती रुसेल ॥ १२ ॥

श्लोक. (पृथ्वी.)

असें वचन ऐकुनी पति वदे कसें आयका ॥
खराब भलता असा तिजशिं दोष देऊं नका ॥
सुवर्तन तिचें असें महदे जें जगन्नायका ॥
अह्मीच न ह्मणूं कसें तिजशिं वर्णिती बायका ॥१३॥

आर्या. (गीति.)

शब्द असे ऐकुनियां वदला तो साधु वचन तें ऐका ॥
होईलच कार्य तुझें तिळभरही बाळगूं नको शंका १४

---

१ स्त्री. २ आनंद देणारें.

साकी.

घरीं जाउनी विचार तिजशीं कांगे असशी रुष्ट ॥
उपाय याला काय करूं मी कशी करूं संतुष्ट ॥१५॥

श्लोक. (भुजंगप्रयात.)

गरीबश्रिमधेंही बहू सौख्य होतें ॥
जरी जोडपें राहिलें एकचित्तें ॥
तुला दावितों मौज मी जोडप्याची ॥
पहा प्रीति आहे कशी तूं तयाची ॥ १६ ॥

श्लोक. (पृथ्वी.)

असें वदुनियां तिला मजकडेस घेऊन ये ॥
कळेल मग युक्ति तूं तिजशिं दुःख देऊं नये ॥
कठोर वच बोलणें बहुत हो मना बाधतें ॥
बहू कठिण कामही सहज युक्तिनें साधतें ॥ १७ ॥

साकी.

साधूचें हें भाषण ऐकुनि निजसदनीं[1] तो गेला ॥
झालेला वृत्तांत सर्वही कथिला निजकांतेला[2] ॥१८॥

श्लोक. (इंद्रवज्रा.)

बोले प्रियेला चल आज जाऊं ॥
त्या साधुचें दर्शन शीघ्र घेऊं ॥
तो कोणती युक्ति कथील पाहूं ॥
तिच्या नियोगें स्वसुखांत राहूं ॥ १९ ॥

आर्या. (गीति.)

पतिचें भाषण ऐकुनि बोले कांता असा कसा साधू ॥
बोलाविलें मला कां, कोणी भलता असेल कीं भोंदू २०

---

१ आपल्या घरीं. २ आपल्या बायकोला.

श्लोक. (इंद्रवज्रा.)

तो साधु माझें करणार काय ॥
तो काय याला करितो उपाय ॥
मी काय आहें अगदींच वेडी ॥
आहे मला अक्कल थोडथोडी ॥ २१ ॥

श्लोक. (साकी.)

ह्या जन्मीं तर तुमचें माझें मुळींच जमणें नाहीं ॥
पूर्णपणें मी समजुन चुकलें रडतें धायीं धायीं ॥२२॥
(माझें) दैवच हें खोटें ॥ जातिल यत्न फुकट मोठे ॥ध्रु०॥
भाषण ऐसें ऐकुनि तिजला बोले मग तो कांत ॥
कांगे ऐसी निराश होसी अर्थ काय गे यांत ॥ २३ ॥
(चलगे) साधुकडे जाऊं ॥ आपण आनंदी होऊं ॥ध्रु०॥
निराशता ही मोठी खोटी वैरीणच समजावी ॥
उद्योगाला विन्मुख करिते नाहीं कां तुज ठावी ॥२४॥
(चलगे) सा०

श्लोक. (इंद्रवज्रा.)

झाली तुझी गे अगदीं निराशा ॥
आहे तरी हो मज फार आशा ॥
उद्योग हा व्यर्थ कधीं न जाई ॥
अंतीं सखे सत्फल तोच देई ॥ २५ ॥
माझ्यावरी लोभ बहू तयाचा ॥
सांगेल तो योग्य उपाय साचा ॥
तो मान्य झाला तुजला जरी गे ॥
कांहीं नसे न्यून मला तरी गे ॥ २६ ॥

श्लोक. ( शिखरिणी. )

असे मोठा ज्ञाता बहुत बरवा साधु चल गे ॥
नसे भोंदू त्याला धन वसन[1] कांहींच नलगे ॥
दयेच्या योगानें सकल कुजनां[2] बोध करितो ॥
तशांचीं दुःखेंही श्रवण करुनी खेद हरितो ॥ २७॥

दिंडी.

तुझें माझें होईल चित्त एक ॥
तरी मज तो तुच्छ गे स्वर्गलोक ॥
सुखें राहूं संसार करूं नामी ॥
पडूं दोघें निश्चयें एक कामीं ॥ २८ ॥

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

आहे काय मजा अशांत तुजला मी काय सांगूं तरी॥
वागूनी बघ एकचित्त मग तूं होईल गे खातरी ॥
संसारांत सुरेख एक मतिनें जें जोडपें नांदतें ॥
ऐकें गे कथितों खरोखर तुला होतें जगद्वंद्य तें॥२९॥

श्लोक. ( इंद्रवज्रा. )

हें जाणतें मी वदली तयाला ॥
परंतु कांहीं न उपाय याला ॥
त्वद्वृत्ति माझ्या मतिला मिळेना ॥
वागूं कशी मीं मज हें कळेना ॥ ३० ॥

साकी.

नाहीं कांहो मजला इच्छा एकचित्त असण्याची ॥
परंतु कथितें वाटे चोरी सन्निध मज बसण्याची॥३१॥

---

१ वस्त्र. २ वाईट लोकांस.

भीत भीत मी तुमच्यापाशीं वदतें जी जी गोष्ट ॥
तुह्मास ती ती रुचतच नाहीं होतां मजवर रुष्ट॥३२॥
जें जें मी इच्छितें कराया त्याच्या तुह्मी विरुद्ध ॥
काय करावें न सुचे कांहीं होउन वसतें स्तब्ध ॥३३॥
लेखन वाचन हिशेब शिकलें मी हो तुमच्यापाशीं ॥
तेव्हां होतें प्रेम मजवरी तें गेलें विलयाशीं ॥ ३४ ॥

श्लोक. ( इंद्रवज्रा. )

बोले तियेला मग काय कांत ॥
तूं ऐक गे देउन नीट चित्त ॥
प्रेमें जरी मी वदलों तरी गे ॥
तो शब्दही सांप्रत तूज लागे ॥ ३५ ॥

श्लोक. ( भुजंगप्रयात. )

विरुद्धा तुझी जाहली बुद्धि खास ॥
ह्मणूनी तुला होतसे हाच भास ॥
जरी बोललों मी हिताचीच गोष्ट ॥
तुला वाटतें फार मी फार दुष्ट ॥ ३६ ॥

श्लोक. ( इंद्रवज्रा. )

केला जरी त्याग तुझा तरी गे ॥
दैवावरी तूं भरशील रागें ॥
कां कीं तुझा दोष तुला कळेना ॥
माझ्या मताला मतही मिळेना ॥ ३७ ॥

पद. (चाल–दोदिवसांची तनु हे साची० )

प्रेम तुजवरी नसतें जरि तरि कां तुज नेतों साधुकडे॥
संशय हाही फेडूं तेथें चल चल जाऊं चल तिकडे॥धु०

तुझी चुकी कां माझीच चुकी वदेल साधू तो स्पष्ट ॥
भीड तयाला कांहीं नाहीं कां गे भोगिशि तूं कष्ट ॥
दैवीं नाहीं दैवीं नाहीं कां गे वदशी ही गोष्ट ॥
बोध तयाचा चित्तीं धरुनी होऊं आपण संतुष्ट ॥
स्वसुखें नांदूं सर्व जन्मभर दाऊं दुसऱ्यांना कित्ता ॥
साधुकृपेचा अघटित महिमा दयाच येईल भग-
वंता ॥ ३८ ॥ प्रे० ॥

श्लोक. ( मालिनी. )

मधुर मधुर ऐशा बोलुनी भाषणाला ॥
निजवधुसह[1] गेला साधुच्या दर्शनाला ॥
नमन उभयतांनीं हात जोडूनि केलें ॥
सकल कथन केलें वृत्त जें जाहलेलें ॥ ३९ ॥

श्लोक. ( भुजंगप्रयात. )

बसा हो असें बोलला त्यांस साधू ॥
उभे राहिले त्या स्थलीं कार्यसाधू ॥
करानें करी रोजचें साधु काम ॥
मुखानें वदे नाम हो राम राम ॥ ४० ॥
मुलें माणसें साधुचीं ह्याच रीती ॥
जयाचा असे तोच धंदा करीती ॥
घराच्यापुढें अंगणीं काम चाले ॥
पहातांच ती शांतता मान डोले ॥ ४१ ॥

---

१ आपल्या स्त्रीसह.

०/१/-९८७-



श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

कोणी आणिति सूत तेंचि फिरवी कोणी रहाटासही ॥
घाली पीळ सुतास एक दुसरा गुंडाळितो त्यासही ॥
कोणी रंग करून त्यांत भिजवी एकेक मोठा पिळा ॥
नाना रंग सुतास देत बसती काळा निळा जांभळा ॥ ४२ ॥

चाले माग कसा ह्मणून बघतें हें जोडपें कौतुकें ॥
धोटें त्यांत फिरे कसें पटपटा तेथें न दृष्टी टिके ॥
एकामागुन एक सूत्र मिळतें होतें कसें वस्त्र हो ॥
होई साफ नवें सबंध लुगडें कोठें न त्या छिद्र हो ॥ ४३ ॥

श्लोक. ( भुजंगप्रयात. )

प्रकाशामुळें वस्त्र तेथें चकाके ॥
नवा रंग हो त्यामुळें तो झकाके ॥
अशा संधिला साधुनें काय केलें ॥
तिथें आपल्या पत्निला[1] बोलवीलें ॥ ४४ ॥
ह्मणे आण लावून येथें दिवा गे ॥
तिनें आणिला दीप लावून वेगें ॥
उभी राहिली हस्तकीं घेउनीयां ॥
तिला तो वदे ठेव तूं नेउनीयां ॥ ४५ ॥

श्लोक. ( इंद्रवज्रा. )

घेऊन गेली मग दीप जेव्हां ॥
आश्चर्य झालें बघत्यांस तेव्हां ॥

---

१ बायकोस.

तें जोडपें साधुस त्या विचारी ॥
१०. ही कोण आहे तरि हो बिचारी ॥ ४६ ॥
कां आणिला लाउनि दीप येथें ॥
कां ठेविला नेउन तो स्थलातें ॥
येथें कमीही न उजेड कांहीं ॥
चित्तांत हें कारण येत नाहीं ॥ ४७ ॥

श्लोक. (चाल मत्तमयूरी.)

बोले साधू आहे माझी ही कांता ॥
देते माझ्या प्रेमें आनंदच चित्ता ॥
येथें आतां दीप कशाला आणविला ॥
प्रश्नाचा मीं जाब तुह्मांला जाणविला ॥ ४८ ॥

आर्या. (गीति.)

ऐसी आज्ञा पाळी जी स्त्री ती पतिस होय आवडती ॥
आज्ञा मोडी जी ती मोहक असली तरीहि नावडती ४९

श्लोक. (भुजंगप्रयात.)

हिला बोललों आण येथें दिवा गे ॥
ममाज्ञाच ही वंद्य मानूनि वागे ॥
हिला हा दिसे सूर्य तैसा उजेड ॥
हिला लागलें काय हो सांग वेड ॥ ५० ॥
पुरी जाणतेही नसे कांत मूर्ख ॥
हिचा चालतो सर्व कामांत तर्क ॥
मनीं मानिते व्यर्थ हो काम कांहीं ॥
पतीचें मला सांगणें होत नाहीं ॥ ५१ ॥

असे या जगीं मूर्ख जी बायको ती ॥
न मानी वचां[1] हो तिची बुद्धि कोती ॥
पतीला ह्मणे कीं कळेना उजेड ॥
तुह्मा लागलें काय हो आज वेड ॥ ५२ ॥
महामूर्ख ती याहुनी जास्त बोले ॥
पतीला ह्मणे काय हो नेत्र गेले ॥
जहालां कधीं अंधे[2] आणूं दिवा मी ॥
नसे मूर्ख मी आणि ऐसी रिकामी ॥ ५३ ॥

श्लोक. ( चाल–मत्तमयूरी किंवा मात्रामत्तमयूरी. )

आज्ञाधारक[3] पत्नि[4] असे ती आवडती ॥
कधिंही नाहीं होणारच हो नावडती ॥
भर्त्याचें[5] ती प्रेम जडवुनी घेत असे ॥
भर्ता तीच्या पूर्णपणें स्वाधीन वसे ॥ ५४ ॥
मानुनि आज्ञा प्रेम पतीचें जडवीते ॥
येतां हातीं अद्भुत गोष्टी घडवीते ॥
दुर्व्यसनी जो बापाचेंही वच मोडी ॥
पत्निवचें[6] तो दुर्व्यसनालाही सोडी ॥ ५५ ॥
येतां भर्ता स्त्रीच्या हातीं वांकविते ॥
व्हावा तैसा वर्णूं न शके हो कवि ते ॥
पूर्वी असुनी उधळ्या धरितो कृपणपणा ॥
हटकुन करिते पतिविषयींच्या तीहि पणा ५६

---

१ पतीच्या शब्दास. २ अंधळे. ३ आज्ञा मानणारी. ४ बायको. ५ नवऱ्याचें. ६ बायकोच्या भाषणानें.

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

आज्ञाधारक जी असे कुलवधू ती हो पतीला प्रिय ॥
संतोषार्थ तिच्या करीत असतो जें आपणा अप्रिय ॥
यात्रा व्यर्थ तसेच देव दगडी व्याख्यान देतो जरी ॥
कांतेच्या मनरंजनार्थ अवघ्या तो तीर्थयात्रा करी ५७

श्लोक. ( यूथिका. )

भेटला जरि तशांत सुधारक ॥
प्रश्न तो करितसे अति मारक ॥
त्यास उत्तर कसें मग योजितो ॥
जो स्त्रियेस वश हो पतिराज तो ॥ ५८ ॥

आर्या. ( गीति. )

देशाटनार्थ करितों यात्रा मी पूजितों जरी देव ॥
नाहीं मद्भक्ति परी यांतच मी शोधितों खरें तत्त्व५९

श्लोक. ( भुजंगप्रयात. )

पहा हो पहा फार हो मौज तीची ॥
जिनें जोडिली प्रीति पूर्णा पतीची ॥
जिनें पाळिली सोसुनी कष्ट आज्ञा ॥
तिची वाटते धन्यता फार सुज्ञा ॥ ६० ॥

श्लोक. ( द्रुतविलंबित. )

पतिस ती गमते जणु दैवत ॥
पुरवितो मग नित्य मनोरथ ॥
निजवधू नसतां नयनांपुढें ॥
घडिघडी बहु कोसळतें रडें ॥ ६१ ॥

श्लोक. (शालिनी.)

माहेरीं हा धाडितो हो प्रियेला ॥
केशा गोष्टी सांगतो हो तियेला ॥
तेथें भारी राहणें योग्य नाहीं ॥
यावें येथें काम योजून कांहीं ॥ ६२ ॥
किंवा तेथें काम योजून कांहीं ॥
भार्येसंगें हा स्वयें कांत जाई ॥
माहेराचा हेतु पुर्ता करोनी ॥
बोले झालें काम माझें ह्मणूनी ॥ ६३ ॥

श्लोक. (इंद्रवंशा.)

घेऊन येई मग तो बरोबरी ॥
तिच्याविणें चैन न त्या खरोखरी ॥
परस्परांचें मन एक होतसे ॥
संसारयात्रा मग सौख्य देतसे ॥ ६४ ॥

श्लोक. (इंद्रवज्रा.)

हें ऐकुनी भाषण विप्रपत्नी ॥
बोले असें सौख्य मला प्रयत्नीं ॥
जन्मांत ह्या हो मिळणार नाहीं ॥
तुह्मास हें तत्त्व कळे न कांहीं ॥ ६५ ॥
कांहीं स्त्रियांचे पति फार भोळे ॥
भार्याविचा[1] पाळिति ते निराळे ॥
बाईलवेडे असतात कैक ॥
ते त्याच नादीं असतात गर्क ॥ ६६ ॥

---

१ बायकोच्या शब्दाला.

श्लोक. ( उपेंद्रवज्रा. )

तशांतला हो मम कांत नाहीं ॥
येथें न चालेच उपाय कांहीं ॥
तैसे न हे कांत मदीय भोळे ॥
बाईलवेडे नर ते निराळे ॥ ६७ ॥

श्लोक. ( स्वागता. )

ते लळा पुरवितातच तीचा ॥
त्या स्त्रिया पुरवितात पतीचा ॥
ते सुखास परस्पर भोगती ॥
आमची तर विरुद्धच हो गति ॥ ६८ ॥

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

जें जें मी कथितें विरुद्धच गमे माझ्या पतीला सदा ॥
नाहीं तें मिळणार आज मजला "पाहूं पुढें" वायदा!॥
केला हट्ट जरी कितीहि रडलें काढून मोठा गळा ॥
नाहीं हाच जवाव लोभ अमुचा जैसा विळा भोपळा६९

श्लोक. ( वसंततिलका. )

ह्यांनीं मला शिकविलें शिकलें घरीं मी ॥
वाचीं लिहीं सतत हो नव्हतें रिकामी ॥
आतां मला नच सुचे मन खिन्न झालें ॥
हा जीवही मज नकोच मनांत आलें ॥ ७० ॥

श्लोक. ( द्रुतविलंबित. )

मजवरी ममताच खरी नसे ॥
मग पुढें दिन जातिल हो कसे ॥

फल न लेशं मिळे जरि मी रुसें ॥
मज भविष्य पुरें नयनीं दिसे ॥ ७१ ॥

श्लोक. (पृथ्वी.)

असें वचन ऐकुनी पति वदे कसें हो तरी ॥
तुझेंच मन गे तुझी करिल निश्चयें खातरी ॥
विचार करुनी मनीं गतदिनांकडे तूं बघ ॥
किती सुख दिलें तुला कथन तूं करीं हें मग ॥७२॥

श्लोक. (वसंततिलका.)

कां मीं तुला शिकविलें तरि गे लिहाया ॥
कां मीं दिले तुज सुलेख तरी पहाया ॥
पोथ्या कितीक तरि कोठुन आणिल्या गे ॥
त्या कां तरी बघ दिल्या बसल्याच जागे ॥ ७३ ॥
कां ठेविले इतर नोकर हे घरीं मीं ॥
केली कशास तुजला तरि हो रिकामी ॥
मोलें दिलें तरि कसें गृहकृत्य सांग ॥
आणूं नको मम सखे स्वमनांत राग ॥ ७४ ॥

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

होतां गे तुज अल्पसेंहि दुखणें कां वैद्य मीं आणले ॥
होतील श्रम गे तुला ह्मणुनियां चित्तांत मीं जाणलें ॥
ठेवीली गरिबी असूनहि तुझी तर्तूद तेव्हां कशी ॥
नाहीं काय तुझ्यावरी सुममता चित्तीं करीं चौकशी७५

---

१ थोडकेंही. २ गेलेल्या दिवसांकडे.

श्लोक. (द्रुतविलंबित.)

घडिभरी तुज चैन नसे जरी ॥
तरि घडे मम वृत्तिच बावरी ॥
तुजशिं हें नसलें जरि ठाउक ॥
तरि हवें तुजशीं तसलें बक ॥ ७६ ॥

श्लोक. (शिखरिणी.)

तुला जेव्हां कांते कळत नव्हतें लेखन मुळीं ॥
न ठावा ज्ञानाचा लवहि तुजला होतिस खुळी ॥
तदा माझी आज्ञा हितकर तुला वाटत असे ॥
सखे अर्धज्ञानें[1] तव मतिस हा भ्रंशच वसे ॥ ७७ ॥

श्लोक. (शालिनी.)

अर्धज्ञानें भावना मीपणाची[2] ॥
शंका येते माझिया सांगण्याची ॥
वाटे भीती निश्चयें वागण्याची ॥
चोरी होते वस्तुही मागण्याची ॥ ७८ ॥

श्लोक. (उपेंद्रवज्रा.)

तुझें तुला गे मन फार खातें ॥
बोलावयाचें मग धैर्य जातें ॥
अज्ञानयोगें मग खिन्न होसी ॥
असूनियां कांत[3] गुणज्ञ होसी ॥ ७९ ॥

श्लोक. (इंद्रवज्रा.)

अज्ञान तो ठेवुन भाव ऐके ॥
सज्ञान ऐके समजून देखे ॥

---

१ अर्धवट ज्ञानानें. २ अहंपणाची. ३ नवरा.

अर्धे जया ज्ञान तयास कांहीं ॥
ब्रह्मा थके त्यास उपाय नाहीं ॥ ८० ॥

दिंडी.

तुझी इच्छा पुरवीत आज नाहीं ॥
त्यांत आहे गे स्वार्थ तुझा पाहीं ॥
फार बालक खावया गोड मागे ॥
तरी देते कां माय मला सांगें ॥ ८१ ॥
तया बाळा येतसे फार राग ॥
तसा आहे हा जाण तुझा भाग ॥
बालकाची समजूत कशी होते ॥
व्यर्थ कां गे माय त्या दुःख देते ॥ ८२ ॥

आर्या. (गीति.)

पतिचें भाषण ऐकुनि बोले होऊन तप्त ती आंगीं ॥
बाळाहुनि बाळच मी मजला केली कशास अर्धांगी ८३

श्लोक. (भुजंगप्रयात.)

ह्मणे साधुला पाहिली मान हानी ॥
कशी होतसे काय सांगूं कहाणी ॥
मुलाहूनही मूल मातेंच केलें ॥
पतीच्या पुढें आमुचें काय चाले ॥ ८४ ॥

श्लोक. (मात्रामत्तमयूरी.)

साधू बोले ऐकें गे तूं स्वस्थपणें ॥
ऐकुनि घेतां काय तरी होईल उणें ॥
ऐकें कथितों लीनपणा हा बहु नामी ॥
कवि हे वदती ताठा येईना कामीं ॥ ८५ ॥

---

१ लग्नाची बायको.

जोंवरि आहे ताठा तोंवरि अज्ञान ॥
ताठा जातां मानव होतो सज्ञान ॥
मोठ्या मोठ्या ज्ञात्यांचा हा सिद्धांत ॥
अनुभव येतो नित्य पहाना धादांत ॥ ८६ ॥
कांट्यांचें जें नमतें परडें तें भारी ॥
चढतें हलकें ह्मणते ही दुनिया सारी ॥
दृष्टांतातें चित्तीं धरूनीच नमावें ॥
थोरपणा मग त्यांच्या हृदयांतच मावे ॥ ८७ ॥
त्वद्भर्त्र्याची[2] माया तुजवरती आहे ॥
कां तो झुरतो चित्तीं शोधुनि तूं पाहें ॥
नाना यत्नें कां तुज येथें तो आणी ॥
आज्ञा मानुनि शोभे जैसी नृपराणी ॥ ८८ ॥

आर्या. (गीति.)

ऐसीं वचनें ऐकुनि बोले ती विप्रपत्नि[3] विनयानें[4] ॥
ऐकावी कां आज्ञा पतिनें केली असेल अनयानें[5] ॥८९॥
काय असे तव पति हा, मूर्ख ययाला कळे न नय[6] अनय[7] ॥
विद्वन्मान्य असा हा, कुळवंताचा असेच कीं तनय[8] ९०
नांवालौकीकाची, याला नाहींच काय गे गरज ॥
हितकर जें दोघांला, ती आज्ञा हा करील हें समज ९१
गुरुवचन सुखद शिष्या, मातृपित्याचें तसेंच पुत्रास ॥
पतिचेंही कांतेला त्याचा मानूं नयेच कीं त्रास ॥९२॥

---

१ ताजव्याचें. २ तुझ्या नवऱ्याची. ३ ब्राह्मणाची स्त्री. ४ नम्रपणानें ५ अनीतीनें. ६ नीति. ७ अनीति. ८ मुलगा.

श्लोक. (द्रुतविलंबित.)

वचन हेंच कडू जर लागलें ॥
उपजली मति दुष्ट न चांगलें ॥
समज ही खुण तूं हृदयांतरीं ॥
अवदसा शिरली घरच्याघरीं ॥ ९३ ॥
भरवसाच नसे पतिचा जरी ॥
पतिहि तो मग कृत्रिमही करी ॥
भरवसा पतिचा धरला जरी ॥
हरि मनोरथ हो पुरवी तरी ॥ ९४ ॥

श्लोक. (इंद्रवज्रा.)

भर्त्यास ज्या मानिति देवरूप ॥
भर्ता असे निर्धन वा कुरूप ॥
मानूनि आज्ञा किति धन्य झाल्या ॥
त्या तूं कथा आठव वाचलेल्या ॥ ९५ ॥

श्लोक. (भुजंगप्रयात.)

कयाधू[1] मुलाला कसें वीष पाजी ॥
ह्मणे पाळ आज्ञा असा कांत पाजी ॥
तिनें पाळिली पूर्ण आज्ञा पतीची ॥
ह्मणूनीच झाली जगीं कीर्ति तीची ॥ ९६ ॥
असा कांत आहे तुझा काय मूर्ख ॥
कळेना तया न्याय अन्याय तर्क ॥

---

१ हिरण्यकशिपूची स्त्री. हिनें नवऱ्याची आज्ञा पाळण्याकरितां पोटच्या पोराला विष पाजलें.

मनीं मान तूं पूर्ण गे भाग्यशाली ॥
अशा या पतीची तुझी गांठ झाली ॥ ९७ ॥

श्लोक. ( द्रुतविलंबित )

बिघडलें पतिचें मन हो जरी ॥
कुलवधू पडते अति घाबरी ॥
फुकट जन्म तिला गमतो खरा ॥
विनविते पतितेंच कृपा करा ॥ ९८ ॥

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

जेव्हां लागतसे खरेंच पतिला प्रत्यक्ष हो वेड गे ॥
तेव्हां हा धरबंध सर्व सुटतो होती बहू दांडगे ॥
कांता जी असते सुशील बरवी सेवा पतीची करी ॥
मानी धन्य वदे बरीच घडली माझ्या करें[1] चाकरी९९
होतां मूर्ख पति स्वयें सकलही संसार घ्यावा करीं[2] ॥
आज्ञा वर्ज्य तदा परंतु करणें लागेच गे चाकरी ॥
आहे जोंवर भार सर्व पतिच्या तोट्यानफ्याचा शिरीं ॥
आज्ञापालन मुख्य धर्म सतिचा आहे खरा तोंवरी१००

श्लोक. (मालिनी.)

निज पति करितो जें त्यांत होईल तोटा ॥
समजुनि जरि आलें त्यांत गे स्वार्थ मोठा ॥
सुचवुनि पतिला तें स्वस्थचित्तें रहावें ॥
पतिसह मग सारें जें घडे तें पहावें ॥ १०१ ॥
अनुभव मग येतां वाढते पूज्यबुद्धि ॥
स्मरण मग घडे गे येतसे पूर्ण शुद्धि ॥

---

१ हातानें. २ हातांत.

वळवुनि मग भर्ता आपलासा करावा ॥
मन नच दुखवावें धीर तेथें धरावा ॥ १०२ ॥

श्लोक. (शिखरिणी.)

अशा सोप्या यत्नें जडत असतें प्रेम बरवें ॥
सुखी होती दोघे मग न भलतें त्यांस करवे ॥
पतीची सुस्त्रीला पतिस वधुची लागत कळ ॥
असें झालें बाई तरि समज संसार सफळ ॥ १०३ ॥

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

जो भर्ता अति सुज्ञ हो चतुर गे स्वस्त्रीस तो पारखी[1] ॥
आज्ञा ही भलती करी कर ह्मणे तूं दासिच्या सारखी ॥
दीधें ही टिकली[2] तरीच बरवी आज्ञा कसोटी[3] कशी ॥
झाली आवडती तदा मग वदे झाली पुरी चौकशी १०४
मारी जो पति शत्रुला कुलवधू साहित्य देई तया ॥
ठेवी लोभ जयावरी पतिच तो त्याची हिलाही दया ॥
ऐसें गे पतिच्या मना मन मिळे तेव्हां मिळे गे सुख ॥
होतें त्या समयीं खरेंच कथितों साऱ्या जनां कौतुक १०५

श्लोक[4]. (प्रियंवदा.)

उमजली निजमनांत शाहणी ॥
घडविली नवि जगांत काहणी ॥
मननपूर्वक करीलच पाहणी ॥
तिज नकोच दुसरी सुमोहिनी ॥ १०६ ॥

---

१ पारखून ठेवीत असतो. २ टिकाव धरला. ३ परिक्षा करण्याचा दगड. ४ हा श्लोक स्त्रीशिक्षणबोध नांवाच्या स्वकृत पुस्तकांत आहे.

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

बोले काय तदा पतीस चुकलें अन्याय माझा ख
झालें लीन तुह्मापुढें विनवितें आतां क्षमा हो कर
साधूचा उपकार फार घडला माझ्या शिरीं हो सदा ।
भेटीनें चुकली ह्मणून बरवें आलीच होती गदा ॥१०७॥
आनंदें मग तो ह्मणे तुजवरी आणीन मी कां गदा ॥
आज्ञोलंघनदोष तूंच करुनी तूं भोगिल्या[1] आपदा ॥
झालें ज्ञान तुला खरें समज गे ही साधुची हो दया ॥
आतां काय उशीर गे प्रियसखे असतु सुभाग्योदया ॥

श्लोक. ( यूथिका. )

लाडके कलह हा मिटला जरी ॥
जाहलेंच समजें सुख अंतरीं ॥
साधुला नमुनि तूं चल गे घरीं ॥
कोण साधुविण सांग दया करी ॥ १०९ ॥

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

आज्ञा वंद्य ह्मणूनियां मग सखी साधूस वंदी तदा ॥
प्रेमें वंदन हा करी तरुणी त्या साधुच्या हो पदा ॥
ऐसें होउन एकचित्त करिती प्रेमें हो काम तें ॥
तूं गे आवडती तिला मग ह्मणे तूं योग्य माझ्या मतें ॥
ठेवी प्रेम तिच्यावरी, पति सदा दोघेंहि आनंदलीं ॥
संसाराब्धि[2] कठीणही परि सुखें अत्यंत तीं नांदलीं ॥
दोघांचें जरि एकचित्त असलें त्याला न कांहीं उणें ॥
एकाचें मुख पश्चिमेस दुसरें पूर्वेस तें धिक् जिणें ॥१११॥

समाप्त.

---

१ आपल्या. २ संसारसमुद्र.